सकाळ

# कणबरकर पुरस्काराने आज एन. डी. पाटील यांचा गौरव



एन. डी. पाटील

कोल्हापूर, ता. ११ : ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने शनिवारी (ता. १२) सन्मानित करण्यात येत आहे.

लोककला केंद्रात सायंकाळी पाच वाजता कार्यक्रमास सुरुवात होईल. १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव, रयत शिक्षण संस्था व निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल यांना यापूर्वी या पुरस्काराने सन्मानित केले आहे.


या पुरस्कारासाठी डॉ. पाटील यांची निवड केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आग्रही असणारे डॉ. पाटील आघाडीवर राहिले. स्थापनेनंतरच्या कालखंडातही विद्यापीठाच्या जडणघडणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विद्यापीठाच्या पहिल्या सल्लागार समितीचे सदस्य, अधिसभा सदस्य, कार्यकारिणी सदस्य, सामाजिकशास्त्र अधिष्ठाता असा त्यांचा प्रवास आहे. त्यांच्या योगदानाबद्दल २००६ मध्ये विद्यापीठाने त्यांचा मानद पदवी डी.लिट. देऊन गौरव केला आहे.

Kolhapur, Main
12/01/2019 Page No. 3

## महत्त्वाचे

# एन. डी. पाटील यांचा आज गौरव

कोल्हापूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे



अध्यक्ष शरद पवार हे कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. आज, शनिवारी संध्याकाळी साडेपाच वाजता पवार यांच्या हस्ते प्रा. एन. डी. पाटील यांना रा. कृ. कणबरकर पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. एक लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. शिवाजी विद्यापीठ आणि शालिनी कणबरकर यांच्यातील सामंजस्य करारानुसार विद्यापीठाचे माजी कुलगुरु व प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार देण्यात येतो.

पुढारी

# प्रा. एन. डी. पाटील यांना आज कणबरकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि.१२ )प्रदान केला जाणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2019
तरुण भारत

# ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील यांना आज पुरस्कार प्रदान सोहळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ज्येष्ठ नेते एन डी पाटील यांना राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार देण्याचा सोहळा आयोजित केला आहे. हा शनिवारी दि. १२ सायंकाळी ठीक ५.०० वा शिवाजी विद्यापीठाच्या सभागृहात होणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मान्यवर नेतेगण व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी राष्ट्रवादीच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल साळोखे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

सकाळ

# चळवळीतून जोडलेली माणसं आमचा आधार

**सामान्य माणसांचे जगणे सुसह्य करण्याचा ध्यास घेऊन निर्धारपूर्वक उभारलेल्या चळवळी, लढ्यांतून अनेक माणसं जोडली. कष्टकऱ्यांपासून दिग्गजांपर्यंत माणसांचा गोतावळा आजही साहेबांना भेटायला येतो. आयुष्यभर कमवलेली हीच खरी संपत्ती आम्हाला आधाराची वाटते, असा भाव ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या सुविद्य पत्नी सरोज (माई) पाटील यांनी 'सकाळ'शी बोलताना व्यक्त केला. ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील यांना आज रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. यानिमित्त त्यांच्याशी साधलेला संवाद...**

**- शिवाजी यादव**

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांना रा. कृ. कणबरकर पुरस्कार शनिवार (ता. १२) प्रदान करण्यात येणार आहे. या निमित्ताने माईंशी संवाद साधला. डॉ. पाटील यांच्या राजकीय, सामाजिक चळवळींच्या साक्षीदार असलेल्या माईंनी सरांच्या सामाजिक, राजकीय धडाडीच्या कार्यामागील बलस्थाने, व्यक्तिगत आयुष्यातील शिस्त असे पैलू उलगडले.

माई म्हणाल्या, ''सर चळवळीत आहेत, याची पूर्वकल्पना आम्हाला होती आणि त्याला आमची मान्यताही होती. सामान्य माणूस, शेतकरी, कामगाराचं जगणं सुसह्य व्हावं या ध्यासाने ते चळवळीत कार्यरत आहेत. सुरवातीपासूनच धावपळ, दौरे सुरू असतात, महिन्यातील २८ दिवस ते कामात असतात. उरलेल्या दोन दिवसांचे कामही ते घरी घेऊन येत. यातून संसाराकडे किंवा मुलांकडे लक्ष देण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळाला नाही; पण आम्ही कधीही कुरकूर



एन. डी. पाटील



सरोज पाटील

केली नाही. उलट आम्हाला त्यांच्या कार्याचा आदरच वाटला.''

त्या म्हणाल्या, ''आमदारकीचे पैसे समाजासाठीच वापरले जावेत असा कटाक्ष त्यांनी जपला आहे. दौऱ्यांच्या निमित्ताने ते सतत एसटीने प्रवास करायचे, अनेक भागांत ते चालत फिरायचे, मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी लिफ्टचा वापर न करता ते सहाव्या मजल्यावर पायऱ्या चढून जायचे. आयुष्यभर निर्व्यसनी राहिले. व्यक्तिगत स्तरावर शिस्त जोपासली. सततच्या व्यायामाने कमावलेले शरीर व भक्कम मनाने त्यांना चांगली साथ दिली आहे, त्या आधारावर सतत समाजासाठी झोकून देऊन ध्येयाने पेटून उठत ते

> आमची मुले संस्कारी आहेत, ती आमच्याकडे आपुलकीने लक्ष देतात. सरांच्या सहवासात ज्यांनी आयुष्य घालविले, त्या कार्यकर्त्यांची घरी सतत ये-जा असते. पवार परिवार, रयत शिक्षण संस्था अशा सर्वांचा पाठिंबा आम्हाला असतो. आयुष्यभर जोडत गेलेली माणसंच आमचा आधार आणि पाठबळ आहेत.
> - सरोजताई पाटील

समाजासाठी लढत राहिले.''

रायगड, मावळ परिसरातील सीआरझेडचा लढा त्यांनी निकराने लढविला. मेधा पाटकरांपासून ते महाराष्ट्रातील अनेक दिग्गज समाजकारणी त्यांच्यासोबत लढ्यात उतरले आणि तो लढा यशस्वी झाला. सीमाप्रश्नातही त्यांना तुरुंगवास सोसावा लागला; पण त्यांनी तो लढा नेटाने सुरू ठेवला. टोल आंदोलन, वीज दरवाढविरोधी आंदोलनापर्यंत असंख्य लढे, मोर्चा, आंदोलनांचे नेतृत्व त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळल्याचे माईंनी सांगितले.

माई म्हणाल्या, ''एवढ्या व्यापातून त्यांनी वाचनाचा छंद जोपासला, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या चरित्रापासून ते अनेक विषयांवर त्यांनी चौफेर वाचन ठेवले. त्यांच्या सामाजिक कार्याला साथ देत घरसंसार, नोकरी मला सांभाळावी लागली. शिवाजी विद्यालयात विलेपार्ले येथे शिक्षिका म्हणून दीर्घकाळ काम केले. पुढे त्याच संस्थेत सचिव पदाची जबाबदारीही माझ्याकडे आली; पण या साऱ्या प्रवासात आमचा संसार, मुलंबाळं, सरांचे सामाजिक, राजकीय कार्यक्रम, चळवळी, आंदोलन आमच्यासाठी ऊर्जा ठरली.''

Kolhapur, Main
12/01/2019 Page No. 2

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2019

पुण्यनगरी

# शरद पवार आज कोल्हापुरात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष खा. शरद पवार शनिवार, दि. १२ जानेवारी रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येत असून या दिवशी ज्येष्ठ



विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कार कार्यक्रमासाठी ते उपस्थित राहणार आहेत. शनिवारी कोल्हापुरात त्यांचा मुक्काम असून, रविवारी गडहिंग्लज येथील एका कार्यक्रमासाठी ते उपस्थित राहणार आहेत. शनिवारच्या मुक्कामात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते जिल्ह्याच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्याची शक्यता आहे.

▶▶ पान ७ वर

## शरद पवार आज कोल्हापुरात

पवार हे महिनाभरात दोन वेळा कोल्हापूर दौऱ्यावर आले आहेत. त्यांचा हा तिसरा दौरा असून, या दौऱ्यामध्ये ते शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डॉ. एन. डी. पाटील यांना जाहीर करण्यात आलेल्या कणबरकर पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. शनिवारी सकाळी ते खानापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रम आटोपल्यानंतर बेळगावहून दुपारी साडेतीनच्या सुमारास हेलिकॉप्टरने कोल्हापुरात येणार आहेत. विद्यापीठ येथील कार्यक्रमानंतर ते कोल्हापुरात पंचशील हॉटेल येथे मुक्काम करणार आहेत. रविवार, दि. १३ जानेवारी रोजी सकाळी नऊच्या सुमारात ते गडहिंग्लजला रवाना होणार असून, त्या ठिकाणी सकाळी दहा वाजता एका कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. तेथून ते मुंबईला रवाना होणार आहेत.

दरम्यान, पवार कोल्हापुरात मुक्काम करणार असल्याने या दिवशी राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून जिल्ह्यात सुरू असलेला कलगीतुरा आणि उलटसुलट प्रतिक्रिया या पार्श्वभूमीवर ते या दिवशी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या जिल्ह्यातील नेत्यांना बोलवून सूचना देऊन या विषयाला पूर्णविराम देण्याची शक्यता आहे.

### मुश्रीफ यांच्या घरी भेट

राष्ट्रवादीचे नेते आमदार हसन मुश्रीफ यांच्या मातोश्रींचे निधन शुक्रवारी झाले. त्यामुळे कोल्हापूर दौऱ्यावर येत असलेले शरद पवार हे या दौऱ्यादरम्यान आ. मुश्रीफ यांच्या घरी भेट देणार आहेत. शनिवारी सायंकाळी किंवा रविवारी सकाळी ते कागल येथील मुश्रीफ यांच्या घरी भेट देतील.

12 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवसंकल्पना प्रतिपूर्तीसाठी पूरक साधनांची गरज

## आयआयटी-बीएचयुचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जितेंद्र कुमार यांचे प्रतिपादन : आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मटेरियल सायन्सच्या संशोधनात विविध नवकल्पनांची निर्मिती आणि त्याच्या प्रतिपूर्तीसाठी पूरक साधनसुविधांची उपलब्धता होणे ही महत्त्वाची गरज बनली आहे. संशोधकांनी त्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन 'आयआयटी-बीएचयु' चे ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जितेंद्र कुमार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अन्ड मटेरियल बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' या विषयावरील चौथ्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सदर्न तैवान विद्यापीठाचे प्रा. डब्ल्यू. सी. चँग यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

प्रा. जितेंद्र कुमार पुढे म्हणाले, मटेरियल सायन्सच्या संशोधनात दर्जावृद्धीची मोठी गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि अर्थसाह्य यांची उपलब्धता या बाबीही महत्त्वाच्या ठरतात. या क्षेत्रात मूलद्रव्यांच्या गुणधर्मांची अत्यंत चिकित्सकपणे पडताळणी, फेरपडताळणी या बाबींना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. संशोधन क्षेत्रात निरीक्षणाचे महत्त्व अबाधित आहे. त्यामुळे संशोधकांनी आपली निरीक्षणशक्ती विकसित करण्यावर भर देण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'मटेरियल सायन्स' परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जितेंद्र कुमार. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रा. डब्ल्यू. सी. चँग व इतर मान्यवर.**

अध्यक्ष स्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आजच्या युगात सर्वसामान्य नागरिकांना किफायतशीर साधने, उत्पादने उपलब्ध होण्यामध्ये मटेरियल सायन्समधील संशोधनाचे महत्त्वाचे योगदान आहे. नवसंकल्पना आणि नवनिर्मिती यांना संशोधनाच्या क्षेत्रात प्रचंड महत्त्व आले आहे. नवनिर्मितीच्या केंद्रस्थानी मटेरियल सायन्स आहे. विज्ञानाचा प्रवास आता शोधनिबंध प्रकाशनाकडून उपयोजनाकडे होतो. संशोधकांनी वैज्ञानिक क्षेत्राच्या परीघाबाहेरील व्यापक समाजापर्यंत या संशोधनाची माहिती देण्यासाठी तर नवसंशोधकांनी स्टार्ट-अपच्या माध्यमातून आपल्या नवसंकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची गरजही कुलगुरूंनी व्यक्त केली.

मान्यवरांच्या हस्ते परिषदेच्या स्मरणिकेचे सीडीच्या स्वरुपात प्रकाशन करण्यात आले.

अधिविभाग प्रमुख डॉ. व्ही. जे. फुलारी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. परिषदेचे समन्वयक प्रा. ए. व्ही. मोहोळकर यांनी परिषदेच्या उद्दिष्टांविषयी माहिती दिली. नीलेश तलवार यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, माजी अधिविभाग प्रमुख डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. सी. एच. भोसले यांच्यासह संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# युवकांनी संशोधन समाजाच्या कल्याणासाठी वापरावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधन हे समाजाच्या कल्याणासाठी वापरले तर त्याचे उपयोगीतामूल्य सतत वाढत राहते. त्यामुळे युवकांनी त्यांचे संशोधन समाजाच्या कल्याणासाठी वापरावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेची शुक्रवारी सांगता झाली. यावेळी ते बोलत होते.

या परिषदेमध्ये देश-विदेशातील एकूण १२ तज्ज्ञ व्याख्यात्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तर दीडशेहून अधिक सहभागी संशोधकांनी त्यांचे संशोधन भित्तीपत्रक स्वरूपात सादर केले.

सांगता कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारी, अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. नीलेश तारवाळ आदी मान्यवर उपस्थित होते. परिषदेचे संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JAN 2019
तरुण भारत

# आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेची सांगता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद शुक्रवारी पार पडली. यामध्ये देशविदेशातील एकूण १२ तज्ञांचे मार्गदर्शन सहभागी संशोधक विद्यार्थ्यांना लाभले. तर दीडशेहून अधिक सहभागी संशोधकांनी त्यांचे संशोधन भित्तीपत्रक स्वरूपात सादर केले. भौतिकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. वि. जे. फुलारी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

भित्तीपत्रकाचे परीक्षण भौतिकशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विजया पुरी आणि रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. आर. एम. माने यांनी केले. अखेरच्या सत्रात पारितोषिक वितरण सोहळा झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते. त्यांनी या परिषदेचे यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. एस. के. शेख. डॉ. आर. एस. व्हटकर, प्रा. पी. एस. पाटील, प्रा. व्ही. जे. फुलारी. प्रा. आर.जी. सोनकवडे, प्रा. सी. एच. भोसले, प्रा. विजया पुरी, डॉ. ए. व्ही. मोहोळकर आदी होते. पारितोषिके विजेते– कुणाल बोरसे ,अमित भोसले, एस. कोटरेश, डॉ. गणेश आगवणे, सत्यजित पाटील, अखिलेश पाटील यांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

12 JAN 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वि. स. खांडेकर यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयातर्फे वि. स. खांडेकर यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त संग्रहालयातील त्यांच्या अर्धपुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी 'वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय : एक दृष्टिक्षेप' या विषयावरील माहितीपट दाखवण्यात आला.

वि. स. खांडेकर यांच्यावरील माहितीपटाची संकल्पना निर्मिती राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे उदयसिंह राजेयादव यांची असून लेखन,




दिग्दर्शन, निवेदन अभिजित सोकांडे, निवेदन अमृता कुलकर्णी, कॅमेरामन कृष्णात कांबळे, संकलन सूरज कांबळे यांचे आहे. कॉइन्स स्टुडिओच्या माध्यमातून हा माहितीपट साकारण्यात आला आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, केशव केंगळे, धैर्यशील राजेभोसले, दिग्विजय राजेभोसले, पूनम सुतार, मंगल लोहार, अरविंद पाटील, सुदर्शन उपलंचवार, डॉ. रामेश्वर कांबळे, डॉ. रेश्मा दिवेकर, डॉ. सुचेता औंधकर यांच्यासह विद्यार्थी, साहित्यप्रेमी उपस्थित होते.